**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६१४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ 216 /सन २०१८-१९
बांद्रा, मुंबई ४०० ०५१ दिनांक: ०१/०२/२०१९

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२०** वी बैठक दिनांक **१२/११/२०१८** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलॅन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २० वी मासिक बैठक दि.१२/११/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती श्वेता भट<br>दि.०६.०२.२०१८<br>Destruction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांचा अहवाल दि.१७.१०.२०१८ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून प्राप्त झाला आहे.<br>• सदस्य सचिवांनी प्राप्त अहवालानुसार सदर जागेत कांदळवनालगत पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचे दिसून आल्याने मे. रोमा बिल्डर्स व डंपर यांचे मालक व चालक यांचे विरुध्द कासारवडवली पोलीस स्टेशन येथे ई.पी.ए अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने पोलीस निरीक्षकांना तपास पुर्ण करुन संबंधीत कागदपत्रे न्यायालयीन कार्यवाहीसाठी MPCB कडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश दिले.<br>• तसेच सदर जागेचे Restoration करण्याबाबत समितीने सदर जागेवर वन विभागामार्फत सदर जागेवर किती Restoration ची आवश्यकता आहे त्याचा आढावा घेऊन कांदळवनाच्या लागवडीची अंदाजपत्रकीय रक्कम ठाणे महानगरपालिक व तहसिलदार ठाणे यांना कळवावी व त्यानुसार जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या व तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे, पोलीस विभाग, MPCB, उपवनसंरक्षक ठाणे |
| २ | श्री. नंदकुमार पवार Feedback on site visit of Uran taluka. | | |
| | 1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | • समितीने या तक्रारीबाबतचा Factual Report गेल्या ३ महिन्यापासून प्रलंबित असल्याने या तक्रारीबाबतचा अहवाल प्राधान्याने देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना निर्देश दिले.<br>• या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांना विचारणा केली असता त्यांनी सदर जागेवर शिवाजी महाराज स्मारकाचे काम चालू आहे तसेच कोठेही कादंळवनाची तोड झालेली नाही, सदर ठिकाणी पाणथळ नसल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड, सिडको |
| | 2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by | • सदर तक्रारीबाबत सिडको यांच्या प्रतिनीधींनी Coastal Road साठी सर्व परवानग्या घेऊन काम केलेले आहे तसेच ज्या ठिकाणी कांदळवन होते तेथे न्यायालयाची परवानगी घेतली आहे असे समितीला सांगितले. | सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | blocking of tidal water flow. | • या जागेवर कांदळवनाची हानी झाली आहे किंवा कसे ते तक्रादारासोबत तपासून समितीने या बाबतचा अहवाल देण्यास सिडको यांना निर्देश दिले.<br>• तसेच ही तक्रार कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीकडे पाठविण्याबाबत सांगितले. | |
| | 3) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves. | • सदर तक्रारीबाबत JNPT विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तथापी सदर जागेवर कांदळवन पुर्नस्थापित करण्यात आलेले आहे.<br>• समितीने या संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांना विचारणा केली असता त्यांनी या तक्रारीबाबत चा अहवाल तपासून पुढील बैठकीपूर्वी सादर करतो असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने या ठिकाणी मोठया प्रमाणात कांदळवनाचा नाश झाल्यामुळे समितीने या तक्रारी संदर्भात JNPT ला सदर जागेवर Restoration करण्यास आणि पाण्याचा प्रवाह योग्य रितीने चालू ठेवण्याच्या सूचना देण्याबाबत जिल्हाधिकारी रायगड यांना सूचना दिल्या.<br>• तसेच ही तक्रार कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीकडे पाठविण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |
| | 4) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing. | • या तक्रारी संदर्भात उप विभागीय अधिकारी, पनवेल यांनी सदर जागेवर JNPT मार्फत शेडचे काम चालू असून तेथे कांदळवन व पाणथळ नसल्याचे सांगितले तसेच सदर काम हे कांदळवनापासून ५० मीटर अंतराबाहेर सुरु आहे असे सांगितले होते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतचा Factual Report गेल्या ३ महिन्यापासून प्रलंबित असल्याने प्राधान्याने या तक्रारीबाबतचा अहवाल देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना निर्देश दिले.<br>• तसेच ही तक्रार कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीकडे पाठविण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |
| ३ | श्री. राजीव दत्ता KW53:- Destruction of mangroves &Wetland by hiranandani builders, Thane. | इतिवृत्तातील मुद्दा क्र.१ प्रमाणे. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ४ | श्री.राजीव दत्ता KW72:- Destruction of wetlands & mangroves for personal gains. Bhiwandi, Thane. | • या तक्रारी संदर्भात उपस्थित निवासी उप जिल्हाधिकारी यांनी सदर जागेवर स्थळ पहाणी केली असता तेथे कोठेही डेब्रिजचा भराव केलेला नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतचा लेखी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच अहवाल प्राप्त झाल्यावर ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Complaint No: KW7<br>Wetland destruction<br>अज्ञात व्यक्ती गायमुख रेतीबंदर गांधी प्लॉट येथे भरणी | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांच्या अधिकाऱ्यांनी कांदळवनास कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने एकत्र स्थळ पहाणीचा Factual Report देण्याबाबत समितीने तहसिलदार ठाणे यांना सांगितले होते.<br>• तहसिलदार ठाणे यांनी एकत्र स्थळ पाहणी झाली असून त्याचे अहवाल प्राप्त झाले असलेचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना या बाबतचा अहवाल समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे, ठाणे महानगरपालिका |
| ६ | श्री. धिरज परब - भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास झाल्याबाबत.<br>स्थळ :- भाईंदर प, जि.ठाणे. | • सदर जागेवर वारंवार अतिक्रमण होत असल्याबाबत व काही प्रमाणात माती भराव देखील असल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• यापूर्वी सदर जागेवर कांदळवनावर होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे वारंवार महानगरपालिकेमार्फत निष्कासीत करण्यात आले होते असेही तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सध्यस्थितीत स्थळ पहाणी करुन त्या जागेवर असलेले अतिक्रमण व माती भराव हटविण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ७ | श्री. धिरज परब :-<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. | • या तक्रारी संदर्भात समितीने तहसिलदार ठाणे यांना एकत्र स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश दि.४.०९.२०१८ च्या बैठकीत दिले होते,<br>• त्यानुसार तहसिलदार ठाणे यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिका, पोलीस निरीक्षक आणि तक्रारदारा सोबत स्थळ पहाणी करण्यात आली असे सांगितले.<br>• स्थळ पहाणी मध्ये तहसिदलार ठाणे यांनी सदर ठिकाणी २५० एकर चे क्षेत्र असून त्याच्या बाजून खाडी जाते, तेथे गवताळ जागा असून तेथे भराव केल्याचे दिसून आले असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना निर्देश दिले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ८ | श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी | • समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करून व सीआरझेड चे उल्लंघन. | • तसेच सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | |
| ९ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार वसई यांनी तक्रारदाराकडून योग्य सर्वे नंब प्राप्त न झाल्याने वसई विरार महानगरपालिकेला पत्र देण्यात आले असून त्यांनी सदर ठिकाणी ४ ते ५ गाव आहेत त्या ठिकाणी पाणथळ असलेल्या जागेचे सर्वेनंबर प्राप्त झाले आहे त्या नुसार सर्वे करण्याचे काम चालू असलेचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करण्यास सांगितले व त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार वसई यांना निर्देश दिले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर |
| १० | श्री.धिरज परब :- भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने (पॅन इंडिय) कटकारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबतची तक्रार | • या संदर्भात एस्सल ग्रुपने तहसिलदार यांच्या आदेशावर आव्हान (Appeal) करण्यात आले त्याची चौकशी प्रलंबित आहे असे सांगितले.<br>• या बाबतचा अहवाल प्राधान्याने पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे आदेश समितीने दिले आहेत.<br>• तहसिलदार ठाणे यांच्या दि.९.१०.२०१८ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर अनधिकृत माती भराव झाल्याने रु. १८,९२,४००/- व बाजार मुल्याचे पाचपट दंड रक्कम रु. ४,७३,१०,०००/- असे एकुण रक्कम रु. ४,९२,०२,४००/- इतकी रक्कम शासकीय खजिन्यात सदर आदेश मिळाल्यापासून सात दिवसात जमा करावी असे कळविण्यात आले आहे.<br>• समितीने या बाबत वसूलीची कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सांगितले.<br>• तसेच या जागेच्या Restoration करण्यासाठी वन विभागाशी संपर्क साधून किती खर्च लागेल त्याची माहिती महापालिकेला देण्याबाबत समितीने सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ११ | श्री. धिरज परब :- आमदार नरेंद्र मेहता यांनी सत्ता व पदाचा दुरुपयोग करून महापालिका आदींच्या संगनमताने पर्यावरणाचा केलेला ऱ्हास ७११ क्लब | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी झाली नसल्याने समितीने लवकरात लवकर स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १२ | **श्री. धिरज परब**<br>मीरारोडच्या कनकिया भागात सर्वे क्र. ३८ मध्ये पाणथळ, कांदळवन, सीआरझेड मध्ये पर्यावरणाचा | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांनी मिरा-भाईंदर महापालिका, तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पहाणी करण्यात आली असलेचे सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे)<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऱ्हास केले बाबत. | • समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक Co-ordinates सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सांगितले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | |
| १३ | **श्री. अजिंक्य पाघधरे**-पालघर जिल्ह्यातील मौजे धाकटी डहाणू येथे महसूल गावं बाडापोखरण येथिल सर्व्हे नं.३७१ अ १/१/१/१ मधिल कांदळवन पाणथळचा नाश करून बांधलेल्या बेकायदा बांधकामबबाबत. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार डहाणू यांनी ८ ऑक्टोबर २०१८ रोजी चौकशी करण्यात आली होती त्या ठिकाणी कोणती झाडे आहेत याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच तेथे शौचालयाचे काम चालू असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी कांदळवन नसून पाणथळ जागा असल्याचे ही त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही जागा पाणथळ आहे किंवा कसे त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक Co-ordinates सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार डहाणू यांना सांगितले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर |
| १४ | **श्री. धिरज परब**:- भाईंदर पूर्व जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन पाणथळ सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केलेबाबत | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी न झाल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तात्काळ या जागेची स्थळ पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १५ | **श्री. धिरज परब**:- जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी न झाल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तात्काळ या जागेची स्थळ पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १६ | **श्री. धिरज परब** :- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५ मध्ये महापालिकेने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव व | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी न झाल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तात्काळ या जागेची स्थळ पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | अन्य बांधकामे काढून कांदळवनाची लागवड करणेबाबत. | | |
| १७ | श्री. बद्री चॅटर्जी<br>Wetland reclamation at, opposite of Cielo, LODHA spendora, Bhayander pada, Ghodbandar road, Thane. | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी न झाल्याचे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तात्काळ या जागेची स्थळ पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| १८ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | • या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांना सदर जागेची तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड सिडको |
| १९ | श्री. नरेशचंद्र सिंग<br>(अभिव्यक्ती गृप)<br>Please Help Us Save Kharghar Sector 35 Pond - TOI report | • या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांना सदर जागेची तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको |
| २० | श्री. नरेशचंद्र सिंग<br>(अभिव्यक्ती गृप)<br>Citizen Inventory of Wetlands/Mangroves/Streams present in Kharghar that needs to be protected by the Laws of this land | • या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांना सदर जागेची तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.